26/4/93

शेतमजूर व रोजगार हमी कामगार समन्वय समिती, महाराष्ट्र

---

काकालुआँ मॅन्शन, ५४ बुधवार पेठ, पुणे                    दि. २६ एप्रिल ९३

---

परिपत्रक नं. ७

/0/ २० एप्रिल रोजीचा शेतमजूरांचा मोर्चा सम्पन्न

/0/ १८ मे ९३ रोजी समन्वय समितीची पुणे येथे बैठक.

प्रिय साथी

क्रान्तीकारी अभिवादन ।

आपण ठरविल्याप्रमाणे राज्यातील शेतमजूर व रोजगार हमी कामगारांचा प्रचंड मोर्चा विधान सभेच्या अर्थ संकल्पी अधिवेशनावर नेला. राज्यातील जवळपास २0 जिल्हयातून १५ हजाराचे वर ग्रामिण कष्टकरी मोर्चात सहभागी झाले होते. यावेळी ठाणे - रायगड जिल्हयातून आलेल्या आदिवासी स्त्री-पुरूषांचा सहभाग विशेषत्वाने जाणवत होता.

मोर्चात महाराष्ट्र राज्य शेतमजूर परिषद, महाराष्ट्र राज्य शेतमजूर युनियन, महाराष्ट्र राज्य शेतमजूर युनियन लाल बावटा, शेतकरी शेतमजूर पंचायत, भूमिसेना, श्रमजीवी संघटना, रचनात्मक संघर्ष समिती, कष्टकरी संघटना, श्रमिक मोर्चा, ग्राम स्वराज्य समिती, मानवी हक्क अभियान, गरीब डोंगरी संघटना, जागृत आदिवासी संघटना इ. समन्वय समितीच्या घटक संघटनानी भागीदारी केली.

मोर्चा काळा घोडा येथे अडविल्यानंतर कॉ. संतराम पाटील यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या जाहीर सभेत कॉ. भास्करराव जाधव, श्रीमती मृणाल गोरे. कॉ. दत्ता देशमुख, कॉ. प्रभाकर संझगीरी, कॉ. कुमार शिराळकर, साथी सुभाष लोमटे, कॉ. बुध्दीनाथ बराळ साथी खुमसे अप्पा, कॉ. यशवंती घाणेकर, विवेक पंडीत, साथी काळुराम दोधडे, श्रीनिवास कुलकर्णी कॉ. जीवनराव सावंत. [illegible]

शेतमजूराचे मोर्चाचे शिष्टमंडळास न भेटणा-या सरकारमधील मंत्र्यांना राज्यात ठिकठिकाणी अडवून निदर्शने व घेराओ करण्याचा निर्धार करण्यात आला.

सरकारच्या निषेधार्थ प्रमुख कार्यकर्त्यांचा सत्याग्रह :

मोर्चाचे शिष्टमंडळास मजूर मंत्र्यांनी वेळ देवूनही भेट दिली नाही. सरकारच्या या मस्तवाल वृत्तीचा समन्वय समितीचे वतीने जाहीर निषेध करण्यात आला आणि प्रमुख कार्यकर्त्यांनी पोलिसांचे कडे तोडून विधान भवनाकडे कुच करण्यास सुरूवात केली तेंव्हा ७0 कार्यकर्त्यांना अटक झाली. सर्व सत्याग्रहींना कफ परेड पोलिस स्टेशन मधून रात्री साडे आठ वाजता सोडण्यात आले. सत्याग्रहीत साथी हुसेन दलवाई,

पान नं. २

कॉ. कुमार शिराळकर, श्रीमती वेणू मेघवाले, रामभाऊ वाडू, कॉ. बुध्दीनाथ बराळ, कॉ. भीमराव बनसोड, कॉ. यशवंती घाणेकर, प्रा. पंडीत मुंढे, कॉ. अशोक ढवळे, एकनाथ आव्हाड, कॉ. गणपतराव लोके, आबा कांबळे, श्रीनिवास कुलकर्णी, साथी सुभाष लोमटे इ. प्रमुख कार्यकर्त्यांचा समावेश होता.

१८ मे रोजी पुण्यात बैठक :

समन्वय समितीच्या घटक संघटनांचे प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक मंगळवार दि. १८ मे ९३ रोजी दुपारी १ वाजता श्रमिक हॉल, मंगला सिनेमाचे मागे (धोबी घाटाचे बाजूला ) शिवाजीनगर येथे होणार असल्याने सर्व प्रमुख कार्यकर्त्यांनी बैठकीस उपस्थित रहावे ही विनंती.

घटक संघटनांनी प्रत्येकी २०० रु. समन्वय समितीकडे जमा करायचे आहेत, ज्यांनी केले नसतील त्यांनी ताबडतोब पाठवावेत वा १८ मे च्या बैठकीचे वेळी बरोबर घेवून यावेत ही विनंती.

परिपत्रकाची पोच खूपच थोडे लोक पाठवतात, सर्वांनी खालील पत्त्यावर पोच द्यावी. १२५, समर्थनगर, औरंगाबाद ( ४३१ ००१ )

आपला,

( सुभाष लोमटे )